# महाराष्ट्र शासन

शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, 17 डॉ. आंबेडकर रोड, पुणे-1

फोन नं. ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ E_mail ID- jdhepune@gmail.com

क्रमांक-विसस/पुवि/2025/पुणे विभाग/ 1884 दिनांक -११.०९.२०२५

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

२. प्राचार्य/प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व समाजकार्य महाविद्यालये, **पुणे / अहमदनगर व नाशिक जिल्हे.**

**विषय - अशासकीय अनुदानित मविद्यालयांतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांचे नियमित वेतन हे प्राचार्यांचे स्वाक्षरीने बँक खात्यात जमा करणेबाबत..**

संदर्भ - १. संचालनालयाचे पत्र क्र. अर्थसं/संकीर्ण/2017-18/नियमती वेतन/लेखा- 2/161 दिनांक - ४.१.२०१८.
२. संचालनालयाचे पत्र क्र. अर्थसं २०२०/संकीर्ण/वेतन अदा/लेखा-2/७६५३ दिनांक - १८.११.२०२०.
३. या कार्यालयाचे पत्र क्र. वेतन -2020/2020-21/08/वेतनपथक, पुणे दि. १८.११.२०२०.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येते की, राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे नियमित वेतन अदायगीमधील विलंब दूर करण्यासाठी, वेतनाच्या अदायगीत अचूकता व कार्यक्षमता आणण्यासाठी प्रत्येक विभागीय सहसंचालक कार्यालयात शासन निर्णय दिनांक १७.०२.२००७ नुसार वेतन पथक स्थापन करण्यात आलेले आहे.

यानुसार वेतन देयक कोषागाराकडून पारित झाल्यानंतर सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेकडून बँक ऑफ महाराष्ट्र यांचेकडे महाविद्यालयांची यादी व वेतनाची रक्कम देण्यात येते. यानंतर बँक ऑफ महाराष्ट्र यांचे मार्फत संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या बँक खात्यामध्ये सदरची रक्कम जमा करण्यात येते व त्यानंतर प्राचार्यांकडून महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांच्या बँक खात्यात तातडीने वेतनाची रक्कम जमा करणे अपेक्षित आहे.

उपरोक्त बाब विचारात घेता या कार्याललयाचे संदर्भिय परिपत्रकाद्वारे पुणे विभागातील सर्व महाविद्यालयांना अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे वेतन खाते प्राचार्यांचे नावे काढण्याबाबत सूचित करण्यात आले होते. तथापित अद्यापही काही महाविद्यालयांचे वेतन संस्था व प्राचार्य अशा दोन स्वाक्षरीत होत असल्याची बाब स्पुक्टो संघटनेच्या दिनांक 03.09.2025 रोजी झालेल्या बैठकीमध्ये संघटनेच्या सदस्यांनी निदर्शनास आणून दिली आहे. तथापि विभागातील सर्व प्राचार्यांना या परिपत्रकाद्वारे पुःनश्च कळविण्यात येत आहे की, शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतनाची रक्कम बँक आफ महाराष्ट्र यांचेकडून त्यांचे खात्यामध्ये ज्यादिवशी जमा झाली त्याच दिवशी अथवा लगतच्या कार्यालयीन दिवशी संबधित कर्मचा-यांच्या खाती जमा होण्यासाठी वेतन खाते हे फक्त Single Sign Account म्हणजेच एकेरी स्वाक्षरी असणे गरजेचे आहे. तरी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ. अशोक उबाळे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

सोबत - वरीलप्रमाणे संचालनालयाचे परिपत्रक.